पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अंतर्गत लेखापरिक्षण विभाग
पिंपरी ४११ ०१८
क्र.अलेप/१/कावि/०५ /२०१९
दि. ३१/०७ /२०१९

विषय :- निविदा नस्ती अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडे अभिप्रायाकामी सादर करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत...

परिपत्रक

महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागांमार्फत विविध विकास कामांसाठी देखभाल दुरुस्तीसाठी तसेच वस्तु सेवा खरेदीकामी निविदा कार्यवाही केली जात असून दि.२८/१०/२०१८ चे परिपत्रकानुसार निविदा दर उघडलेनंतर र.रु.५/- कोटी पर्यंतच्या नस्ती अभिप्रायास्तव अंतर्गत लेखापरिक्षण विभागाकडे पाठविणेत येत आहे. तथापि नजीकच्या कालावधीत विधानसभा निवडणूक २०१९ ची आचार संहिता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे निविदा अभिप्राय कार्यवाहीचे कामकाज योग्य प्रकाराने व जलद गतीने व्हावे या करीता सर्व संबंधित विभागांनी निविदा नस्तीमध्ये सर्व आवश्यक कागदपत्रांचा समावेश असल्याची खातरजमा करुन परिपुर्ण निविदा नस्ती सादर करावी. तसेच विभागाचे प्रस्तावामध्ये सर्व आवश्यक बाबींचा समावेश होत नसलेने सोबत जोडलेल्या नमूना निविदा माहितीपत्रकातील (चेकलिस्ट) मधील सर्व मजकुर व्यवस्थितरित्या भरुन निविदा नस्तीसह सादर करणेत यावा. तसेच या संदर्भात यापुर्वी दक्षता व नियंत्रण कक्ष, लेखा विभाग, मुलेप विभाग यांनी वेळोवेळी परिपत्रकांव्दारे निर्गत केलेल्या सुचनांचे पालन करावे. निविदा दर स्विकृतीबाबत विभागाने स्वयंस्पष्ट शिफारस नमूद करणे आवश्यक आहे जेणेकरुन अभिप्रायाचे कामकाजात कागदपत्रांची पुर्तता नसलेने व इतर त्रृटींमुळे होणारा विलंब टळून कामकाज जलद गतीने होईल.

अंतर्गत लेखापरिक्षक
अंतर्गत लेखापरिक्षण विभाग
पिंपरी ४११ ०१८

प्रति,

सर्व संबंधित विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

# निविदा अभिप्राय तपासणी सुची (Check List)

कामाचे नाव

निविदा क्र. निविदा र.रु.

| अ.क्र. | तपशिल | | शेरा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 1 | निविदेचा प्रकार (B1 /B2) महसुली /भांडवली | | | |
| 2 | निविदा प्रसिध्दीस मंजूरी प्राधिकारी | पदनाम | | |
| | | मंजूरी दिनांक | | |
| 3 | निविदा प्रसिध्दी दिनांक (प्रसिध्दी प्रत नस्तीबध्द करावी) जनतासंपर्क विभागाकडील पत्र जोडावे. | | | |
| 4 | निविदा प्रसिध्दी कालावधीत मुदतवाढ आहे काय? असलेस कालावधी | मुदतवाढ१ | दि. ते | |
| | नमूद करावा(मुदतवाढ मान्यता प्रत, प्रसिध्दीप्रत नस्तीबध्द करावी | मुदतवाढ २ | दि. ते | |
| 5 | निविदा कार्यस्थळाची जागा मनपाच्या ताब्यात/मालकीची आहे किंवा कसे? | | | |
| | रेडझोन मधील जागा आहे काय? | | | |
| 6 | निविदा रक्कम उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतुद रकमेच्या दिडपट मर्यादेत आहे काय? नसलेस रक्कम कशा प्रकारे उपलब्ध करुन घेणार याचे स्पष्टीकरण (Cash Flow Chart जोडलेला आहे काय?) | | | |
| 7 | निविदेचे पहिले पाकिट उघडलेचा दिनांक व दुसरे पाकिट उघडलेचा दिनांक | पाकिट क्र.१<br>पाकिट क्र. २ | | |
| 8 | कामकाजाच्या अनुषंगाने इतर सर्व संबंधीत विभागाशी समन्वय साधलेला आहे काय? | | | |
| 9 | प्रस्तुतचे कामासाठी सल्लागार नेमणूक केलेली आहे काय? असलेस तपशील देणे | | | |
| 10 | निविदा कामासाठी शासनाचे अनुदान आहे काय? | | | |
| 11 | स्विकृत योग्य मुल्य निश्चीत केले आहे काय? असलेस त्याच्या तुलनेत प्राप्त दराची टक्केवारी | | | |
| | स्विकृतयोग्य मुल्य निश्चीत करताना विहीत कार्यपध्दतीचा वापर केला आहे किंवा कसे? | | | |
| 12 | निविदापुर्व सभा (Prebid Meeting)घेण्यात आली काय? असल्यास दिनांक व सभावृत्तांत (CSD )Common Set of deviation सोबत जोडले आहे काय? | | | |
| 13 | निविदा १०% पेक्षा अधिक उणे दराची असल्यास दरपृथ:करण सादर केले आहे काय? व विभागप्रमुखांनी छाननी करुन मान्य केले आहे काय? | | | |
| 14 | निविदेत सहभागी निविदाधारकांपैकी कोणाचा काळया यादीत (Black List) मध्ये समावेश होता किंवा कसे? | | | |
| 15 | अपात्र कंत्राटदारांची नावे व अपात्रतेची कारणे | | | |
| 16 | अपात्र कंत्राटदारापैकी कोणी दाद मागण्यासाठी न्यायालयात गेले आहे होते काय? असल्यास दाव्याची सद्यस्थिती | | | |

| अ.क्र. | तपशिल | | शेरा | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 17 | पात्र कंत्राटदाराचा अंतिम देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असले तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. CAT/2017/प्रक्र.८/इमा २ दि.२२/१०/१८ व दि.२६/१०/१८ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही (Performace Security) | | | |
| 18 | कंत्राटदाराच्या क्षमतेबाबत शाखाप्रमुख यांचे अभिप्राय | | | |
| 19 | निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरांची बाबनिहाय छाननी व त्यासंबंधाने दर वाजवी व मनपा हिताचे आहेत किंवा कसे याबाबत विभागप्रमुखांचे अभिप्राय | | | |
| 20 | प्रशासकीय मान्यता देण्याबाबत आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांची व अटीशर्तींची पुर्तता सदर प्रकरणी झाली आहे काय? | | | |
| 21 | विभागाने प्रसिध्द केलेल्या सर्व निविदा अटी व शर्तींची पुर्तता स्विकृत निविदाकार करत आहेत काय? | | | |
| 22 | निविदा मुल्यमापन समितीने निविदेचे मुल्यमापन ज्या कागदपत्रावरुन केले आहेत ती सर्व Download केलेली कागदपत्रे E-Tender प्रणाली मधीलच आहेत काय? | | | |
| 23 | न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाधारकाकडे निविदा दर कमी करण्यासाठी लेखी विचारणा केली आहे काय? असलेस त्याचा व निविदाधारकाने दिलेल्या प्रतिसादाचा तपशिल द्यावा. | | | |
| | मुळ दर | | | |
| | सुधारित दर | | | |

विभागप्रमुख स्वाक्षरी